माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों.क्र.२११२१०/२१/अ.क्र.५८४५/२४/०१

**श्री. झाहिद एफ.खंबाती**
ईस्टर्न सॅनिटरी वर्क्स, १७, न्यू मालिनी कॉ.ऑ.हौ.सो.लि.,
४२, महाकाली गुंफा रोड, अंधेरी (पू.), मुंबई-४०० ०९३.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) एच/प.विभाग,**
सहाय्यक आयुक्त एच/प.विभाग कार्यालय, २ री हसनाबाद लेन,
खार (प.), मुंबई-४०० ०५२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता एच/प.विभाग,**
सहाय्यक आयुक्त एच/प.विभाग कार्यालय, २ री हसनाबाद लेन,
खार (प.), मुंबई-४०० ०५२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २६.१२.२०२४**

अपीलकर्ता : उपस्थित ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे नोटीस दि.०७.१२.२०२४ रोजी प्राप्त झाली आहे.
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ३०.१२.२०२० | १६.०१.२०२१ | ०२.०२.२०२१ | - |

अपिलकर्तांनी जन माहिती अधिकारी यांचे दि. १६.०१.२०२१ रोजीचे उत्तर संलग्न करुन दि. १८.०३.२०२१ रोजी आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि. ३०.१२.२०२० अन्वये "Fate and actions initiated post my letter dated 11th November 2020(Copy of same attached herewith) b)Necessary documentary procurement from Building Proposal dept post my letter dated 11th November 2020, if any for verification of my claims therein! c)Necessary documentary procurement from Building proposal to negate my claims as mentioned in my letter dated 11th November 2020 d)Documentary supports if any, as per records to prohibit corrective measures as mentioned in my letter dated 11th November 2020" याबाबत माहितीची मागणी केलेली आहे.

जन माहिती अधिकारींनी दि. १६.०१.२०२१ रोजी "अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती या कार्यालयात परिरक्षीत केली जात नसल्याने आपला अर्ज सहाय्यक अभियंता (इ व का) एच/पश्चिम विभाग यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात येत आहे", असे उत्तर दिले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे प्रथम अपिल अर्ज दि. ०२.०२.२०२१ रोजी दाखल केला आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि.१८.०३.२०२१ रोजी माहिती मिळाली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) एच/पश्चिम विभाग, श्री. दिपक घोलम व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता एच/पश्चिम विभाग, श्री. मिलिंद कदम उपस्थित आहेत.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. २४.१२.२०२४ रोजी आयोगास सादर करुन नमुद केले की, विशेष मोहिम अंतर्गत अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु अपीलार्थी यांनी माहिती प्राप्त करुन घेण्यास नकार दिला आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) एच/पश्चिम विभाग यांनी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) एच/पश्चिम विभाग यांच्याकडून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५(४) व ५(५) प्रमाणे माहिती प्राप्त करुन अपीलार्थीस देण्यात यावी. तसेच अपिलार्थी यांचे पत्र दि. ११.११.२०२० च्या अनुषंगाने त्यांना प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे सुधारीत उत्तर आदेश प्राप्तीच्या १५ दिवसाच्या आत देण्यात यावी.

सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

प्रदीप व्यास 26-12-2024

**मुंबई**
**दिनांक :२६.१२.२०२४**

**( डॉ. प्रदीप व्यास )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**